**रे.दिवाणी मु.क्रमांक १५७/२०१४**

**निशाणी २१ वरील आदेश**

(दिनांक १०/०२/२०२०)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९अ प्रमाणे मुदतीबाबत प्राथमीक मुद्दा निश्चित करावा यासाठी केलेला आहे. प्रतिवादी व वादी विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादींतर्फे असे नमुद करण्यात आले की, दावा २१/०५/१९९१ रोजीचे कराराआधारे खरेदीपत्र पुर्ण करुन मिळावे यासाठी दिलेला आहे. वादींनी त्यांचे पुर्वहक्कदाराच्या मृत्युनंतर दिनांक २७/११/२००३ रोजी खरेदीपत्र पुर्ण करुन मिळावे अशी मागणी नोटीस प्रतिवादींना पाठवली तेव्हा दाव्यास प्रथम कारण घडले असे वादींचे कथन आहे. मुदतीच्या कायद्यातील तरतुदीनुसार दिनांक २७/११/२००३ पासुन ३ वर्षात वादींनी दावा दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसे केलेले नाही. त्यामुळे सकृत दर्शनीच असे दिसुन येते की, दावा मुदतबाह्य आहे म्हणुन त्याअनुषंगाने प्राथमीक मुद्दा निश्चित करुन सुनावणी घ्यावी अशी विनंती त्यांनी केली.

३. या अर्जास वादींनी आपले म्हणणे निशाणी २३ सादर करत हरकत घेतली. त्यानुसार त्यांनी असे नमुद केले की, प्रस्तुतचा अर्ज केवळ

वादींना त्रास देण्यासाठी आणि दाव्याची चौकशी लांबवण्यासाठी दिलेला आहे. यापुर्वीदेखील प्रतिवादींनी अशा स्वरुपाचा अर्ज निशाणी १६ दिला होता. तो दिनांक ०९/१२/२०१५ रोजी नामंजुर झाला आहे. असे असताना प्रतिवादींनी पुन्हा प्रस्तुतचा खोट्या मजकुराचा अर्ज दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पहाता संपुर्ण पुरावा झाल्याशिवाय दावा मुदतीत आहे की नाही हे ठरविता येणार नाही. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर करावा अशी विनंती त्यांनी केली.

४. वादी प्रतिवादींची परस्परविरोधी कथने विचारात घेत दाव्याचे अवलोकन केले. वादींच्या म्हणण्यानुसार त्यांचे पुर्वहक्कदार रामचंद्र पाटील यांना दावा मिळकत रु. १,१५,०००/- च्या मोबदल्यात विक्री करण्याचे प्रतिवादीने मान्य केले होते. प्रतिवादीला ही मिळकत त्याच्या एकत्र कुटुंबाच्या कायदेशीर गरजेपोटी विक्री करायची होती त्यामुळे प्रतिवादीने दिनांक २१/०५/१९९७ रोजी नोंदणीकृत साठेखत वादींच्या पुर्वहक्कदारांच्या नांवे करुन दिले. त्यादिवशी ठरलेल्या मोबदल्यापैकी रु. २५,०००/- प्रतिवादीने रोख स्वीकारले तसेच दिनांक ०२/०८/१९९७ रोजी उर्वरीत मोबदल्यापैकी रु. २०,०००/- रोख स्वीकारुन त्याबाबत करार करुन दिला. कराराची अंशतः पुर्तता म्हणुन दिनांक २१/०५/१९९७ रोजी वादी कुटुंबाला दिला. सदरची मिळकत नियंत्रीत सत्ता प्रकाराची असल्यामुळे आवश्यक ती विक्री परवानगी प्रतिवादीने आणावी त्यानंतर रजिष्टर खताची पुर्तता करण्यात येईल असे ठरले होते.

५. वादीचे असे देखील कथन आहे की, दिनांक २१/०५/१९९७ रोजी कब्जा मिळाल्यानंतर त्यांनी पैसे खर्च करुन मिळकतीत पाण्याची व्यवस्था केली. जिरायत जमीन बागायत केली, जमीनीची प्रत सुधारली, महसुल प्राधीकरणाकडे काम चालुन वादींचे नांव मिळकतीच्या कब्जासदरी नमुद झाले. त्या प्रकरणामध्ये प्रतिवादीने सर्वप्रथम खरेदीखत करुन देण्यास नकार दिला. या पार्श्वभुमीवर वादींनी खरेदीखताची पुर्तता करुन मिळावी अशी मुख्य मागणी केली असुन करारापोटी दिलेली रक्कम रु. ९५,०००/– व्याजासह वसुल करुन मिळावी अशी मागणी केली आहे. वादींच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने महसुल प्रकरणात दिनांक २३/०८/२०१३ रोजी म्हणणे दाखल करुन प्रथम खरेदीखत पुर्ण करुन देण्यास नकार दिला. या आधारे त्यांनी दिनांक ११/०३/२०१४ रोजी प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

६. वादींची संपुर्ण कथने प्रतिवादीने आपली कैफियत निशाणी १५ द्वारे नाकारली आहेत. एकंदरीतच वादी प्रतिवादींची परस्परविरोधी कथने पहाता दावा मुदतीत आहे की नाही याबाबतचे निष्कर्ष केवळ कायद्याच्या तरतुदींवर अवलंबुन नसुन वादी प्रतिवादींची कथने आणि त्या अनुषंगाने सादर होणारा पुरावा यावर देखील अवलंबुन असल्याचे सकृतदर्शनी दिसते. वादीनी दिनांक २१/०५/१९९७ रोजीच्या कराराची पुर्तता करुन मागीतली आहे. या मागणीला मुदतीच्या कायद्याची बाधा येते की नाही हे केवळ सकृतदर्शनी

परिस्थितीआधारे ठरवणे घाईचे होईल. या प्रकरणात दाव्याच्या मुदतीसंदर्भातील मुद्दा पुराव्याअंतीच निर्णीत करणे योग्य ठरेल. त्याकरीता प्राथमीक मुद्दा काढण्याची आवश्यकता वाटत नाही. दाव्याच्या कामी मुद्दे आजच निश्चित करण्यात येत आहेत. दावा सुमारे ६ वर्षे जुना असल्याने वादी प्रतिवादींनी आपआपला पुरावा लवकरात लवकर सादर करावा. या चर्चेअंती खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे;

## आ दे श

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च प्रतिवादीने सोसावा.

Bhushan Ramesh Thakur

Digitally signed by Bhushan Ramesh Thakur
Date: 2020.02.10 16:51:33 +0530

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– १०/०२/२०२० सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. Pradip T. Patil |
| Court | : | Jt. Civil Court Sr.Dn.Islampur |
| Date of Order/Judgment | : | 10/02/2020 |
| Typed on | : | 10/02/2020 |
| Signed by P.O. on | : | 10/02/2020 |
| Uploaded on | : | 11/02/2020 |